एस.सी.सी. ४८४/२०२३
सरकार वि. भरत व इतर.
**निशाणी २५ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव – सुनिता नामदेव कुमकर, | वय – ५४ वर्षे, |
| व्यवसाय – शेती, | राहणार – विरगाव, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिपक भोर हा माझा भाचा आहे. त्याचे लग्न कोणासोबत व कधी झाले होते हे मला सांगता येणार नाही. घटना कधी व काय घडली होती हे मला माहीती नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता किंवा नाही हे मला माहीती नाही.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे मला माहीती नाही की, माझा भाचा दिपक हा अगस्ती कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्याची ओळख अपेक्षा तोरमल हिचेसोबत झाली व त्यांनी दिनांक २८.१२.२०२२ रोजी आळंदी येथे जावून रजिस्टर लग्न केले. हे म्हणणे खरे आहे की, त्याने मला लग्न झाल्याबाबत सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, अपेक्षाच्या घरचे तिला नांदण्याकरीता आडवत होते त्यामुळे मी, माझा भाचा व माझा भाऊ असे दिनांक १७.०६.२०२३ रोजी संध्याकाळी ०७:३० वाजता अपेक्षा हिच्या घरी गेलो. हे म्हणणे खरे नाही

की, तेथे सर्व आरोपी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना अपेक्षा हीस नांदविण्यास पाठविण्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी प्रदीप भालेराव, सुमीत जाधव यांनी माझा भाचा यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ सोडवण्याकरीता गेलो असता सर्व आरोपींनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी, तुम्ही परत जर इकडे आले तर जिवे ठार मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भाच्याने शेतात फवारणीचे औषध पिले होते. हे मला माहीती नाही की, त्याने सदरचे औषध त्यास झालेल्या मारहाणीबाबत व अपेक्षा हीस तिच्या घरचे नांदविण्यास पाठवित नसल्यामुळे घेतले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्यास हरिश्चंद्र हॉस्पीटल येथे ॲडमीट केले.

३. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तसा माझ्या जबाबात का नमूद केला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. के. बी. हांडे यांच्या मार्फत</u>**

४. उलटतपास नाकारला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.12 17:03:17 +0530

दिनांक १२.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.